# भुयारीकरणाच्या टप्प्यांचे काम शिल्लक

## मेट्रो मार्गिकेचे ५४.५ पैकी ४८ किमीचे काम पूर्ण

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** कुलाबा ते सीप्झ या संपूर्ण भुयारी मेट्रो मार्गिकेच्या भुयारीकरणाचे केवळ ९ टप्पे बाकी असून, आत्तापर्यंत ५४.५ किमीपैकी ४८ किमी भुयारीकरण पूर्ण झाले.

मेट्रो ३ च्या भुयारीकरणाचा पहिला टप्पा २४ सप्टेंबर २०१८ ला पूर्ण झाला होता. त्यानंतर सोमवारी ५ ऑक्टोबरला ३२ वा टप्पा पूर्ण झाला. मेट्रो ३ मार्गिकेवर एकूण १७ टनेल बोअरिंग मशिनच्या (टीबीएम) साहाय्याने हे भुयारीकरण केले जाते. त्यासाठी सात ठिकाणी मोठी विवरे (लाँचिंग शाफ्ट) तयार करण्यात आले आहेत.

आत्तापर्यंत पूर्ण झालेले भुयारीकरण हे पॅकेज दोन, पाच आणि सात अंतर्गत झाले आहे. तर पॅकेज एक, तीन, चार आणि सहामधील भुयारीकरणाचे ९ टप्पे अद्याप बाकी आहेत.

‘मेट्रो–३ मार्ग हा मुंबईतील अत्यंत दाटीवाटीची वस्ती, जुन्या इमारती, ऐतिहासिक वारसा तसेच उत्तुंग इमारती, उड्डाणपूल, मेट्रो मार्ग व रेल्वे मार्गाखालून जात असल्याने येथील भुयारीकरणाचे काम हे आव्हानात्मक आहे. मेट्रो–३ सारख्या क्लिष्ट प्रकल्पासाठी एकूण १७ टनेल बोरिंग मशीन एकाच वेळेला कार्यरत असण्याची भारतात कदाचित ही पहिलीच वेळ असेल,’ असे मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे संचालक (प्रकल्प) सुबोध गुप्ता यांनी सांगितले.



### उर्वरित ९ टप्पे

| टप्पा क्र. | भुयारीकरण टप्पा (स्थानक) | लांबी (मीटर) |
|---|---|---|
| ३३ | चर्चगेट ते हुतात्मा चौक | ६४९ |
| ३४ | सिद्धिविनायक ते दादर | ११२६ |
| ३५ | सहार रोड ते सीएसएमआयए आंतरदेशीय | १५१६ |
| ३६ | हुतात्मा चौक ते सीएसएमटी | ५५१ |
| ३७ | चर्चगेट ते सीएसएमटी | १२३३ |
| ३८ | सायन्स म्युझियम ते महालक्ष्मी (अप) | १११८ |
| ३९ | सायन्स म्युझियम ते महालक्ष्मी (डाऊन) | ११३६ |
| ४० | महालक्ष्मी ते मुंबई सेंट्रल (अप) | ८३७ |
| ४१ | महालक्ष्मी ते मुंबई सेंट्रल (डाऊन) | ८३० |

लोकसत्ता
Thu, 08 October 2020
https://epaper.loksatta.com/c/55514826